# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 15/01/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

विनयभंग

1) पो.स्टे. बेला :– दि. 14/01/2021 चे रात्री 02:00 वा. ते सकाळी 09:00 वा. चे सुमारास 31 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि आपल्या मुलासह छपरीत झोपली असतांना आरोपी नामे– भाऊराव किसना पाटील, रा. मोनोरी याने तेथे येवून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. फिर्यादीला जाग आल्याने ती ओरडली असता घरात झोपलेला तिचा भाउ व वहीनी बाहेर आल्याने आरोपी पळुन गेला. तसेच दुसऱ्या दुवशी सकाळी 09.00 वा. दरम्यान फिर्यादी आपले भावासह आपल्या पतीची मोटरसायकल आणायला गेली असता आरोपीने फिर्यादीचा भाउ यास हातबुक्कयाने मारहाण केली. तसेच फिर्यादी व तिचे भावास अश्लील श्ब्दात शिवीगाळी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 354, 323, 294 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गणेश रॉय 9464382179 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– दि. 14/01/2021 चे 13:00 वा. ते 13:30 वा. चे सुमारास 25 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि घरी एकटी हजर असतांना आरोपी नामे– गजानन मारोती लोनगाडगे, वय 32 वर्ष, रा. मेटपांजरा ता. काटोल याने तीचे घरी अनाधिकृतपणे प्रवेश करून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व सदर बाब कोणालाही सांगितल्यास मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 452, 354(अ)(1)(i)(ii), 354 अ(1)(i)(ii) 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक अश्विीनी वानखेडे 8888110877 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर